# इराण-अमेरिका, ऑस्ट्रेलिया

## चन्द्रशेखर पुरन्दरे

या लेखात दोन महत्त्वाच्या घटनांचा उल्लेख आहे.

इराणच्या उच्च सेनाधिकाऱ्यांची अमेरिकेने हत्या केली ही पहिली. ऑस्ट्रेलियातील आटोक्याबाहेर जाणारे वणवे ही दुसरी.

**इराण-अमेरिका** : हे वैर गेली चाळीस वर्षे चालू आहे. सुरुवातीच्या आदर्शवादातील भिन्नतेत काळानुसार इतर घटकांची भर पडली. इराकमध्ये सद्दाम हुसेनच्या पाडावानंतर व काही काळाने अमेरिका तेथून बाहेर पडल्यानंतर इराणने तेथील हस्तक्षेप वाढवला. तो अमेरिकेला मंजूर नाही. अमेरिकेचे दोस्त-राष्ट्र सौदी अरेबिया आणि इराण यांचे धार्मिक वैर आहेच. त्यामुळे हा हस्तक्षेप सौदीलाही खटकतो. इराण-सौदी-अमेरिका यांची समोरासमोर युद्धे होत नाहीत तर दुबळ्या देशांमध्ये ते पडद्यामागून ही युद्धे चालवतात. उदा. येमेन. तेथे सौदी विरुद्ध इराण युद्ध चालू आहे. बळी पडतो तो सामान्य येमेनी.

दुसरा घटक म्हणजे इराण अण्वस्त्र-मुक्त व्हावा या २०१५च्या आंतरराष्ट्रीय करारातून बाहेर पडण्याचा एकतर्फी निर्णय अमेरिकेने २०१८ला घेतला. त्यामुळे करार मान्य असणाऱ्या इतर राष्ट्रांची पंचाईत तर केलीच पण इराणला परत अण्वस्त्रक्षम होण्याची सबबही मिळाली. अमेरिकेतील अंतर्गत घडामोडी पहाता युक्रेन देशाला ब्लॅकमेल करण्याच्या ट्रम्पच्या गैरवर्तनाची चौकशी आता वेग घेत आहे. त्यामुळे ट्रम्पला त्याच्या लोकांचे लक्ष दुसरीकडे वेधण्याची गरज आहे. अशा वेळी कोणत्या तरी देशावर युद्ध लादण्याची अमेरिकेची परंपरा आहे. [१९९८ ला क्लिंटनची चौकशी चालू असता त्यानेही इराकवर मोठे बॉम्बिंग केले होते.] तसेच अमेरिकन अध्यक्षांची निवडणूकही या वर्षी आहे. अशा कृत्यांनी राष्ट्रवादाला खतपाणी मिळेल व आपल्या विजयाची शक्यता वाढेल हा अंदाज.

या पार्श्वभूमीवर ही हत्या पहायला हवी.

इराकची राजधानी बगदाद. ३ जानेवारीला तेथे आलेल्या काही इराणी सेनाधिकाऱ्यांची हत्या विमानतळाजवळच झाली. ती मानवरहित स्वयंचलित ड्रोनने करण्यात आली. जनरल कासीम सुलेमानी आणि त्याचा इराकी सहकारी अबू मुहंदीस हे प्रमुख बळी. इतरही आठ जण मृत्यू पावले.

मध्यपूर्वेत शिया इराणचा प्रभाव वाढवण्यासाठी Quds नावाची इराणची विशेष लष्करी शाखा आहे. सुलेमानी या शाखेचा प्रमुख. इराक, सीरिया, लेबनॉन आणि येमेन या देशातील इराणच्या कारवाया तिच्या नेतृत्वाखाली होत असत. तद्देशीय विरोधकच नव्हे तर त्या त्या देशातील अमेरिकन Quds चे लक्ष्य असतात. त्यात आजवर शेकडोंनी अमेरिकन ठार झाले आहेत. त्याचा सूत्रधार सुलेमानी. [सुलेमानीवर अमेरिकेने आतंकवादी म्हणून पूर्वीच शिक्का-मोर्तब केले होते.] अलीकडचे निमित्त म्हणजे एका अमेरिकन कॉन्ट्रॅक्टरची २७ डिसेंबरला क्षेपणास्त्रांनी इराकमध्ये हत्या झाली. त्यामागे इराण होता या संशयावरून ट्रम्पने हे प्रत्युत्तर दिले.

ही हत्या अल-कईदाचा ओसामा बिन लादेन व इस्लामिक स्टेटचा अबू अल-बगदादी यांच्या हत्येपेक्षा निराळी आहे. ते दोघेही आतंकवादी कोणत्याच देशाचे नव्हते आणि फरारी होते. सुलेमानी इराणी सैन्याचा उच्चाधिकारी होता. इराणच्या अध्यक्षांचा निकटवर्ती होता. इराणमध्ये तो लोकप्रियही होता. तो राजरोसपणे इराकला येत असे. त्यामुळे हा इराणवर आमने-सामने हल्ला झाला. प्रश्न रक्तरंजित हात असणाऱ्या सुलेमानीची हत्या न्याय्य होती का नाही हा नाही. ती हत्या श्रेयस्कर आहे का हा आहे.

इराण काय प्रत्युत्तर देईल हा प्रश्न आज अनुत्तरित आहे. त्याने इराकमधील अमेरिकन तळांवर क्षेपणास्त्रे पाठवली आहेतच जरी त्यात मानवी हत्या झालेली नाही. इराण इतरही अनेक प्रकारे अमेरिकेवर कुरघोडी करू शकतो. मध्यपूर्वेतील वर उल्लेख केलेल्या देशांत इराणला सहानुभूत किंवा इराणच्या इशाऱ्यावर चालणाऱ्या अनेक स्थानिक शक्ती आहेत. त्या अमेरिकेचे तेथील वास्तव्य अधिक मुश्किल करू शकतात. इराण cyber warfare ही करू शकतो. खुद्द अमेरिकेतही विध्वंस होऊ शकतो. मध्यपूर्वेत एकाहून अधिक ठिकाणी युद्धे नव्याने सुरु होऊ शकतात. इराणच्या कारवायांवर अमेरिका प्रति-कारवाई करणार, परत इराण त्यावर. त्यात इराकचे सध्याचे

सरकार अक्षम आहे. एक भयावह शक्यता म्हणजे इराक ही युद्धभूमी होऊन इराणी लष्कर विरुद्ध अमेरिका संघर्ष तेथे संभवतो. त्यात एक संलग्न पैलू लक्षात घ्यायला हवा - तो म्हणजे इराणच्या इराकमधील ढवळाढवळीविरुद्ध इराकी लोकांनी अलीकडे निदर्शनेही केली होती. म्हणजे, समीकरण सरळ नाही.

अशा प्रकारच्या महत्त्वाच्या कारवाईआधी अमेरिकन काँग्रेसची मान्यता लागते. ती ट्रम्पने घेतली नाही. सुलेमानीला ठार करण्याने युद्धज्वर कमी होईल असा ट्रम्पचा दावा आहे. त्यात तथ्य दिसत नाही. आधीच्या साडेसातशे अमेरिकन सैनिकात नव्या साडेतीन हजार सैनिकांची भरती या प्रदेशात त्याचवेळी करण्यात आली. एकूण मध्य-पूर्वेत विविध ठिकाणी आलेल्या अमेरिकन तळातील अमेरिकन सैनिकांची संख्या एक लाख वीस हजारावर नेण्याचा प्रस्ताव २०१९ च्या मे महिन्यापासून विचाराधीन आहे. हे काही युद्धज्वर कमी करण्याचे धोरण नाही.

बुश व नंतर ओबामा हे अध्यक्ष असतानाही सुलेमानीला ठार करण्याचा विचार झाला होता. पण प्रत्येकवेळी त्याला ठार मारण्याचा परिणाम भविष्यातील अमेरिकनांच्या हत्या वाढण्यात होईल असे मत पडले व तेव्हा त्या अध्यक्षांनी हे पाऊल उचलले नाही.

मध्यपूर्वेत इतरत्र पहाता इस्राएलचा पंतप्रधान नेतान्याहू. तो त्याच्या देशात ट्रम्पसारखाच बऱ्याच अडचणीत आहे. तेथेही लोकांचे लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठी तो इस्राएलला या संघर्षात ढकलू शकतो. इराकने हा हल्ला त्याच्या भूमीवर व त्याला न कळवता झाला म्हणून अमेरिकेला इराकमधून आपला गाशा गुंडाळायला सांगितले आहे. हे इराणच्या पथ्यावरच पडते. त्याबरोबरच अमेरिकेचे साथीदार देश डेन्मार्क आणि जर्मनी यांनीही इराकमधील सहभाग कमी किंवा बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. हे परदेशी प्रामुख्याने इराकी सैनिक व पोलीस यांच्या प्रशिक्षणासाठी असतात. जर्मनीने जॉर्डन आणि कुवेतमधून आपले प्रशिक्षक मायदेशी बोलावले आहेत. याचा संयुक्त परिणाम म्हणजे इस्लामिक स्टेट परत प्रबळ होऊ शकते. अमेरिकन्स, Quds त्यांच्याविरुद्ध लढत होते. आता इराणने अमेरिकनांना लक्ष्य करायचे ठरवल्यावर या प्रदेशातील अमेरिकनांचे प्राधान्य स्वत:ची सुरक्षा सांभाळणे हे आहे, इस्लामिक स्टेटच्या सैनिकांशी लढणे हे नाही.

एकूण ट्रम्पच्या खास आततायी शैलीने विद्वेषाचे राजकारण इराणच्या बरोबरीने पुढे नेले आहे.

**ऑस्ट्रेलिया** : पूर्व व आग्नेय ऑस्ट्रेलियामध्ये मागच्या वर्षीच्या सप्टेंबरपासून प्रचंड वणवे सुरु झाले. ते पसरत राहिले आणि अजून चालू आहेत. या वणव्यांनी सुमारे १५ लाख हेक्टर जमीन जळून गेली आहे. जवळ जवळ १ बिलियन पशु-पक्षी मरण पावले आहेत, त्यातील काही दुर्मिळ जातींचे. २००० हून जास्त घरे बेचिराख झाली आणि ३० च्या आसपास माणसेही बळी पडली आहेत. ऑस्ट्रेलिया बेट आहे. वणव्याच्या उत्सर्गाने किनाऱ्यावरच्या समुद्रातील कार्बन डायऑक्साइड वाढतो, तपमान वाढते, वणव्याने निर्माण झालेली राख समुद्रात जाऊन पाणी अधिक acidic होते, वगैरे. पर्यायाने मासे, वनस्पती या जल-जीवनावरही अनिष्ट परिणाम होतो.

२०१७-१८ मध्ये ऑस्ट्रेलियात मोठा दुष्काळ पडला होता. त्या कोरड्या हवेने व वाढलेल्या तपमानामुळे हे वणवे आटोक्यात येत नाहीत. पर्यावरणाच्या अधोगतीने वणवे लागले हे विवाद्य आहे. वणवे लागण्याचे कारण नैसर्गिक असू शकते उदा. वीज पडणे. किंवा ते मानवी असू शकते. खोडसाळपणे आग लावणे किंवा ती मर्यादित रहावी या उद्देशाने लावलेली आग आवाक्याबाहेर जाणे, एखाद्या अपघाती ठिणगीने आग लागणे, इत्यादी. ऑस्ट्रेलियातील वणवे साधारण पन्नास टक्के नैसर्गिक कारणांनी व पन्नास टक्के मानवनिर्मित असावेत असा आता तरी अंदाज आहे. पण कोणत्याही कारणाने सुरू झाला असो, वणवा लागला की तो पसरणे याचा संबंध निश्चितच पर्यावरणाच्या अधोगतीशी आहे. एका डिग्रीने जरी पर्यावरणाचे तपमान वाढले तरी वणव्याच्या तीव्रतेत मोठा फरक पडतो आणि ऑस्ट्रेलियात ते तसे वाढले आहे.

वणवे लागणे हा ऑस्ट्रेलियातील वार्षिक प्रकार आहे. डिसेंबर ते फेब्रुवारी हा fire season मानला जातो. मात्र या वर्षीचा season लवकर सुरू झाला, अधिक तीव्र आहे, विस्तारही जास्त आहे आणि दीर्घकाळ चालेल अशी शक्यता आहे. पुरेशी पूर्वसूचना मिळूनही सरकार गहाळ राहिले, आधीपासून आग विझवण्याची सामग्री पुरवली गेली नाही असे आरोप होत आहेत. तर पर्यावरणाशी, पृथ्वीच्या वाढत्या तपमानाशी या वणव्यांचा संबंध लावणारे खुळचट डाव्या विचारसरणीचे आहेत असा अजूनही काही राजकारण्यांचा दावा आहे.

www.purandarearts.com
www.art-non-deco.com
artnondeco@yahoo.co.uk